**नारायण वि. मुक्ताबाई व इतर**

**वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ३० खालील आदेश**

**(पारीत दिनांक १८.११.२०२५)**

**CNR No.MHLA140023482025**

**०१.** प्रस्तूतचा अर्ज वादीने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७*** अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीने असे कथन केले आहे की, दाव्यामधील प्रतिवादी क्र. २ गोपीचंद अंबादास क्षिरसागर हे दि. ०९.०८.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. २ चे वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. अर्जातील २/६ हा दाव्यात पुर्वीच समाविष्ट असल्याने नव्याने त्यांना समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही. सबब त्यांना प्रतिवादी गटात प्रतिवादी क्र. २ चे वारसांना समाविष्ट करून तशी दुरुस्ती दाव्यात करण्यासाठी अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. १ ने त्यांचे म्हणणे दाखल करून योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**०५.** वादीने वादपत्रामध्ये प्रतिवादी गटात प्रस्तुत अर्जातील प्रतिवादी क्र. २ चे वारस क्र. २/१ ते २/५ यांना समाविष्ट करण्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे मागणी केलेली दुरुस्ती आवश्यक आहे. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. वादीचा अर्ज **नि.क्र. ३०** मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात प्रतिवादी क्र. २ चे वारस म्हणून २/१ ते २/५ समाविष्ट करून तशी प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.11.19 17:10:06 +0530

**(श्रीमती एस. डी. साबळे)**

दिनांकः- १८.११.२०२५. २रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.